Press Clippings


Publication : Loksatta(Pune Vruttant)
Edition : Pune
Date : Sunday, August 30, 2015
Page No. : 4


# ‘प्यासा’ व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवणार

प्रतिनिधी, मुंबई

**भारतीय चित्रपट** इतिहासात अभिजात कलाकृती म्हणून ओळखला गेलेला ‘प्यासा’ हा चित्रपट व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवण्यात येणार आहे. गुरुदत्त अभिनित आणि दिग्दर्शित ‘प्यासा’ चित्रपटाच्या मूळ फिल्मवर काम करण्यात आले असून खास या महोत्सवात दाखवण्यासाठी चित्रपटाची रिळे मूळ स्वरूपात पुन्हा तयार करण्यात आली आहेत.

७२व्या व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जगभरातून पुन्हा तयार करण्यात आलेल्या अभिजात चित्रपटांसाठी ‘व्हेनिस क्लासिक अॅवॉर्ड’ दिले जाते. या पुरस्कारांसाठी यंदा वीस चित्रपट स्पर्धेत असून गुरुदत्त यांचा ‘प्यासा’ही यंदा पुरस्कारांच्या स्पर्धेत आहे. या चित्रपटांच्या निगेटिव्हचे स्वामित्व हक्क



‘अल्ट्रा मीडिया कंपनी’कडे असून लोकांना एक अभिजात कलाकृती जशी होती त्याच स्वरूपात पाहायला मिळावीत या उद्देशाने या चित्रपटाचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे. ‘हा चित्रपट प्रत्येक फ्रेमनुसार मूळ स्वरूपात आणण्यासाठी आम्हाला चार महिने लागले आहेत. आत्तापर्यंत आम्ही जे चित्रपट पुन्हा तयार केले त्या सगळ्यांमध्ये ‘प्यासा’ हा सर्वार्थाने वेगळा चित्रपट आहे, अशा शब्दांत अल्ट्रा मीडिया आणि एन्टरटेन्मेंट कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुशीलकुमार अग्रवाल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

‘प्यासा’ची रिळे आता जीर्ण झालेली होती. त्यावर अनेक रेषांचे ओरखडे उमटले होते, रिळे बऱ्याच ठिकाणी खराब झाले होते. १९५७ साली हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. आज तो इतक्या वर्षांनी पुन्हा मूळ रूपात प्रेक्षकांना दिसणार असून व्हेनिस चित्रपट महोत्सवात तो ११ आणि १२ सप्टेंबर रोजी दाखवण्यात येणार आहे, अशी माहिती अग्रवाल यांनी दिली.